NTVS's

# G. T. Patil College, Nandurbar (M.S.)

One Day National e-Conference on

**Impact of COVID-19 on Higher Education**

# Best Paper Award

This Certificate is presented to *Dr. Dilip N. Lanjevar* of *Matoshri Shantabai Gote College, Washim* for Best Paper titled 'कोविड १९ या महामारीच्या लॉकडाउन काळात वातावरणात झालेल्या बदलाचा भौगोलिक अभ्यास in the conference organized by the National Service Scheme unit of G T Patil College, Nandurbar (M.S.) on 28/01/2021.

| | | | |
|---|---|---|---|
| Dr D B Deore<br>Org. Secretary | Dr A R Bhuyar<br>Convener | Dr M J Raghuwanshi<br>Organizer<br>Vice- Principal | Prof. V S Shrivastava<br>Principal |

Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts, Commerce & Science College
Washim Dist. Washim

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - I January - March - 2021

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Assistant Professor

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | महिला उद्योजकांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग (विशेष संदर्भ बीड तालुका)<br>डॉ. सय्यद तनवीर बदरुद्दीन | १-५ |
| २ | ग्रामीण भागातील स्त्रियांच्या आरोग्य विषयक समस्या<br>प्रा. डॉ. एच. टी. सातपुते | ६-९ |
| ३ | महिलांची सामाजिक स्थिती व महिलांच्या सक्षमीकरणासाठीच्या शासकीय योजना<br>डॉ. विलास आबा गायकवाड | १०-१३ |
| ४ | शेतीच्या विकासामध्ये स्त्रियांची भूमिका<br>प्रा. डॉ. संजय मगर | १४-१७ |
| ५ | महिला सबलीकरण - काळाची गरज<br>प्रा. डॉ. देविदास विक्रम हारगिले | १८-२५ |
| ६ | प्रबोधन काळात पर्ती म्हणून सुधारक पुरुषांनी स्त्री सक्षमिकरणात निभावलेली भूमिका<br>प्रा. डॉ. भाऊराव रामेश्वर तनपुरे | २६-३० |
| ७ | भारतीय स्त्रियांचे राजकीय सक्षमीकरण<br>प्रा. शहाणे रंजना प्रल्हादराव | ३१-३४ |
| ८ | धर्मग्रंथातील महिलांचे अधिकार व समाज घडविणाऱ्या महिला .<br>डॉ. विश्वनाथ महादेव आवड | ३५-३९ |
| ९ | महिला सक्षमीकरण काल, आज आणि उद्या<br>डॉ. सतीश सांडू ठोंबरे | ४०-४३ |
| १० | भारतातील महिला सुरक्षा : एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>प्रा. डॉ. दिपक राघोजी दामोदर | ४४-४९ |
| ११ | मराठवाडा मुक्तीसंग्रामातील दगडाबाई शेळके यांचे योगदान<br>प्रा. डॉ. संतोष रोहिदास पहारे | ५०-५२ |
| १२ | संत जनाबाई यांचे अभंग आणि महिला सक्षमीकरण<br>डॉ. विष्णू नामदेव लांडे | ५३-५८ |
| १३ | भारतीय समाजातील स्त्रियांची बदलती स्थिती : सिंहावलोकन<br>डॉ. मुरलीधर विठ्ठल हिरे | ५९-६२ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | भारतीय अर्थव्यवस्था : स्री उद्योजकतेची भूमिका, समस्या आणि उपाययोजना<br>डॉ. ए. एस. नलावडे | ६३-६८ |
| १५ | महिलांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकार<br>प्रा. मनीषा महारुद्र गाडवे | ६९-७२ |
| १६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला आर्थिक सक्षमीकरणातील योगदान<br>प्रा. डॉ. अमोल तुकाराम खाडे | ७३-७६ |
| १७ | महिला लोकप्रतिनिधींचे राजकीय सक्षमीकरण : एक सामान्य-अवलोकन<br>डॉ. संतोष भिवसन काकडे | ७७-८२ |
| १८ | महिला सक्षमीकरणात महिला श्रमशक्तीचा सहभाग<br>डॉ. गजानन देवराव चिट्टेबाँड | ८३-८६ |
| १९ | कृषि आणि आर्थिक विकासामध्ये महिलांची भूमिका<br>कु. नविता सुरेंद्र बल्लाळ | ८७-९३ |
| २० | भारतीय महिलांचा राजकीय सहभाग व सबलीकरण<br>डॉ. निलिमा राजाराम मिरजकर | ९४-९८ |
| २१ | महिला सक्षमीकरण : समकालीन निकषांचे संदर्भ<br>डॉ. भगवान सुरेश मनाळ | ९९-१०६ |
| २२ | भारतीय स्त्रीयांचे मानसिक आरोग्य<br>सुरेश श्रीनिवासजी मंत्री | १०७-११६ |
| २३ | भारतीय संविधान आणि महिला सबलीकरण<br>शेख उजमा खलील | ११७-१२२ |
| २४ | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण<br>डॉ. बबन आपले | १२३-१२५ |
| २५ | महिला सक्षमीकरणात मानवाधीकार कायद्याची भूमिका<br>प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार | १२६-१३० |
| २६ | महिला सक्षमीकरनामध्ये बचत गटाची भूमिका<br>प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे | १३१-१३४ |

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com) CC-2

# २५. महिला सक्षमीकरणात मानवाधीकार कायद्याची भूमिका

प्रा. डॉ. दिलीप वि. लांबेवार
भूगोल विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम

प्रस्तावना

प्रत्येक व्यक्ती जन्मतःच स्वतंत्र आहे. मानवाला स्वतंत्रपणे जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. स्वतःचा सर्वांगीन विकास घडवून आणण्यासाठी हि सकंल्पना विकसीत झाली. मानवाधिकाराचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला असता असे दिसून येते की, ही सकंल्पना हळूहळू विकसीत होत गेली. प्रथम इग्लंड या देशात मानवी अधिकारा संबधीत अनेक कायदे करण्यात आले. त्यानंतर युनोच्या स्थापने नंतर मानवाधिकारात वाढ होत गेली. 10 डिसेंबर 1948 साली मानवाधिकाराची घोषणा करण्यात आली. जात, धर्म, पंथ, भाषा तसेच लिंग यावरुन व्यक्तीच्या अधिकारात कुठलाही भेदभाव करता येणार नाही असे घोषनापत्र युनोच्या मार्फत जाहीर करण्यात आले. मानवाला व्यक्ती या नात्याने जे नैसर्गिक अधिकार जन्मतःने प्राप्त होतात त्याला मानवाधिकार असे म्हणता येते. मनुष्याला समाजात उत्तम पातळीवर नेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अधिकांराना पुढे मानवाधिकार असे मानण्यात आले. जागतिक पातळीवर अनेक विद्वान लोकांनी याबाबत आपली मते प्रगट केलेली आहे. व्यक्तीच्या मूलभूत गरजांचा समावेश मानवाधिकारत केला जातो. अन्न, वस्त्र, निवारा आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांचा समावेश मानवाधिकारात केला आहे. स्त्री व पुरूष असे समाजाचे महत्वाचे अंगे मानली गेली आहेत. परंतू आजही समाजातील महिलांना त्यांना मिळालेल्या अधिकाराचा उपयोग करून स्वतःचे स्थान उंचावू शकल्या नाहीत. पुरूषांनी महिलांच्या मानवाधिकाराकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामूळे त्यांना आपला तथा समाजाचा विकास करता आला नाही. त्यामूळे समाजाची अर्धी शक्ती विनाकारण वाया गेली आहे.

एकोणविसाव्या शतकापासूनच भारतामध्ये महिलांच्या अधिकारावर तिच्या सामाजीक समतेच्या संदर्भात भारतीय समाजसुधारकांनी चर्चा केली आहे. त्यासाठी समाजसुधारकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. राजाराम मोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, स्वामी ईश्वरचंद्र विद्यासागर, महर्षी केशव धोंडो कर्वे, महात्मा गांधी, महात्मा फुले, माधव गोविंद रानडे, गोपळ गणेश आगरकर, पंडिता रमाबाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाजसुधारकांनी महिलांच्या उन्नतीसाठी त्यांच्या प्रगतीसाठी तसेच सामाजिक स्थानाकरिता सतत प्रयत्न केले. या सर्व समाजसुधारकांच्या अथक प्रयत्नामूळे भारतामध्ये महिलांच्या समाजिक दर्जा, महत्व व अधिकारांच्या बाबत जाणीव जागृती निर्माण होऊन त्यांच्या अस्तित्वाची दखल घेतल्या गेली. 1965 नंतर महिलांच्या दर्जा सुधारणेचे परिणाम तसेच याच

Assistant Professor
Arts.

काळात स्त्रीमुक्तीचे विचार होऊ लागले. याच काळात स्त्रीमुक्ती ही चळवळ अधिक प्रभावीपणे राबविण्याचा प्रयत्न केल्या गेला.

साधारणतः विसाव्या शतकाच्या सुरूवातीपासून स्त्रियांच्या अवस्थेत व सामाजिक स्थानात बदल होवू लागला. अर्थार्जनासाठी स्त्रिया बाहेर पडू लागल्या आणि त्यातून त्यांना थोडेफार आर्थिक स्वावलंबन लाभले. अर्थात स्त्रिया घराच्या बाहेर पडू लागल्या तरी स्त्री-पुरूष समानतेचे तत्व समाजाच्या गळी लगेच उतरणे शक्य नव्हते. पुरूषप्रधान संस्कृतीचा प्रभाव अजूनही आहेच. स्त्रियांच्या हक्कांच्या प्रश्नाला चालना देण्याच्या कामी संयुक्त राष्ट्रांनी पुढाकार घेतला.

महिला सक्षमीकरणासाठी संयुक्त राष्ट्रसंघाकडून केलेले प्रयत्न

संयुक्त राष्ट्राच्या मानवीअधीकारा विषयी सार्वत्रिक जाहीरनाम्यातही स्त्री-पुरूष समान अधिकाराच्या तत्वांचा समावेश करण्यात आला आहे. या जाहिरनाम्याच्या पहिल्या कलमात असे म्हटले आहे की, सर्व मानव प्रतिष्ठा व हक्क याबाबतीत जन्मतःच स्वतंत्र व समान आहेत. तसेच जाहिरनाम्याच्या दुसऱ्या कलमात असा उल्लेख आहे की, कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता या जाहिरनाम्यातील अधिकार व स्वातंत्र्य प्राप्त करण्यास प्रत्येकजण पात्र आहे. लिंगभेद विचारात न घेता प्रत्येक मानवाला सर्व प्रकारच्या मानवीअधिकरांचा लाभ मिळाला पाहिजे असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आले आहे.

स्त्रियांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या दुर करण्यासाठी संयुक्त राष्ट्राने 1946 मध्ये महिला आयोगाची स्थापना केली. तसेच संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने 1952 मध्ये महिलांच्या राजकीय अधिकाराचा ठराव समंत केला. या ठरावात महिलांना पुरूषांच्या बरोबरीने राजकीय हक्क देण्यासंबधी आग्रह धरण्यात आला. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने 1957 मध्ये विवाहीत महिलांच्या राष्ट्रीयत्वासंबधीचा ठराव संमत केला. 1962 मध्ये विवाह, विवाहाचे किमान वय व विवाहाची नोंदणी यासंबधीचा ठराव पारित करण्यात आला. संयुक्त राष्ट्रांनी सन 1975 हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे केले होते. त्यानिमित्ताने मेक्सिको येथे आंतरराष्ट्रीय महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले. पुढे सन 1985 मध्ये संयुक्त राष्ट्राचा महिला विकास निधी स्थापन करण्यात आला. 1976 ते 1985 हे दशक संयुक्त राष्ट्राचे महिला दशक म्हणून साजरे करण्यात आले. 1980 मध्ये कोपनहेगन या ठिकाणी 1985 मध्ये नैरोबी येथे तर 1995 मध्ये बिंजीग येथे जागतिक महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले. महिलांची स्थिती सुधारण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात याविषयी विचार करण्यात आले. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेचे सन 2000 मध्ये महिला विषयक विशेष अधिवेशन बोलावले होते. या अधिवेशनात बिंजीगच्या जागतिक महिला परिषदेने तयार केलेल्या कृती आराखडयाचा आढावा घेण्यात आला. या विशेष अधिवेशनात महिलांशी संबधित अनेक समस्यांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

## महिलांचा कायदेशीर दर्जा

राज्यघटनेनूसार भारतीय समाजातील प्रत्येक नागरिकास मग तो पुरूष असो अथवा स्त्री सर्वांना समान अधिकार प्राप्त झाले आहेत. त्याचप्रमाणे 10 डिंसेबर 1948 रोजी 'मानवी हक्काची सनद' निर्माण झाली. स्त्रियांसाठी विविध कायदे तयार करण्यात आले. कायदा हा स्त्री सबलीकरणाच्या मार्गातील सर्वात महत्वाचा आधारस्तंभ ठरला आहे. कायदयाच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा, सामाजिक परिवर्तन यांना वेग आणता येतो. म्हणून कायदयाद्वारे स्त्री सक्षमीकरण साधण्यासाठी भारतात विविध कायदे केले गेले. त्यातील महत्वाचे कायदे खालीलप्रमाणे आहेत.

१. सतीबंदी कायदा- 1939, 1987
२. वारसा हक्क अधिनियम - 1980
३. बालविवाह प्रतिबधंक कायदा - 1954
४. विशेष विवाह कायदा- 1954
५. नोदंणी विवाह कायदा - 1954
६. हिंदू विवाह कायदा - 1955
७. वेश्याव्यवसाय विरोधी कायदा-1956
८. दत्तक घेण्याचा कायदा -1956
९. द्विभार्या प्रतिबंधक कायदा - 1955
१०. घटस्फोटाचा कायदा - 1955
११. पोटगी कायदा- 1946, 1956
१२. मातृत्व लाभ कायदा-1961
१३. हूंडा प्रतिबंधक कायदा-1961
१४. विशिष्ट परिस्थितीत गर्भपात करण्याचा कायदा-1972
१५. समान वेतन कायदा-1976
१६. बलात्कार विरोधी कायदा - 1980
१७. अनैतिक व्यापार कायदा-1986
१८. गर्भजल चिकित्सा विरोधी कायदा - 1988
१९. राष्ट्रीय महिला आयोग कायदा-1990
२०. कौटूंबीक हिसांचारापासून स्त्रियांचे सरंक्षण कायदा-2005

अशा अनेक कायदयांच्या माध्यमातून स्त्रियांना विशेष हक्क प्राप्त झाले आहेत.

आजची स्त्रि ही पूर्णपणे काळासोबत बदलली आहे. पूर्वी फक्त चूल आणि मूल सांभाळणे हिच तीची जबाबदारी होती. आज कार्यक्षेत्र विस्तारित आहे. शिक्षण, आरोग्य, सामाजिक बदल, राजकीय बदल,

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

स्वातंत्र्य, बंधुता तसेच विज्ञानवादी जीवन जाणिवामूळे महिलांच्या जीवनात योग्य तो बदल झाला आहे. त्यामूळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात तिचा वावर वाढत जाऊन तिने स्थान निर्माण केले आहे. परंतू पुरूष मर्यादांचे भान ठेवून तिला समाजात दर्जा व आत्मसन्मानाचे स्थान निर्माण करावयाचे आहे. यासाठी मानवीअधिकार व महिलांचे हक्क यांच्या अमंलबजावणीकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

महिलांच्या आरोग्य विषयक मानवाधिकारांचा विचार केला असता असे लक्षात येते की, महिलांना त्यांचा पूर्ण हक्क व अधिकारांचा वापर त्यांना यशस्वीपणे करता आला नाही. भारतीय राज्यघटनेनूसार विचार केला असता असे दिसून येते की, स्त्रियांना सर्व क्षेत्रात समान दर्जा जरी घटनेने दिला असला तरी तिचा जगण्याचा हक्क ती जन्माला येण्यापूर्वीच हिरावून घेतला जातो. गर्भजल परिक्षणामूळे मुलीचा गर्भ नाहिसा करण्यात येतो व त्याचे कुटूंबातील सदस्यांना दुःख न वाटता ते समाधानाचा सुस्कारा सोडतात. गर्भधारणा व अपत्यांना जन्म देणे हा तिचा खास हक्क असला तरी तिने केव्हा व किती अपत्यांना जन्म द्यावा याचा तिला अधिकार नाही. याचाच अर्थ असा की, स्त्रियांना कायदेशीर अधिकार मिळाला असला तरी त्याचा तिला वापर पुरूषी मानसीकतेने करू दिला नाही. याहष्टीने महिलांना अधिक सक्षम बनविणे आवश्यक आहे. अधिकार न वापरण्याचा नेभळटपणा दुर करून तिला निर्भयपणे वावरता आले पाहिजे.

वारसाहक्क, बालविवाह, हूंडाबळी, घटस्फोट, मजुरी, लैंगिक शोषण, नोंदणी विवाह कायदा, वेश्याव्यवसाय प्रतिबंधक कायदा, अज्ञान दत्तक घेण्याचा कायदा, पोटगी कायदा, विशिष्ट परिस्थितीमध्ये गर्भपात करण्याचा कायदा, इत्यादी सर्व कायदे अस्तित्वात असले तरी त्यांचा वापर तिला प्रत्यक्ष जीवनात स्वत[illegible] रक्षणासाठी [illegible] पाहिजे. असे वातावरण समाजात सरकारला निर्माण करावे लागेल. फक्त कायद[illegible]णार नाही त्यांची अमंलबजावणी कशी होईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. महिलांकडे समाजाचा पाहण्याचा इष्टीकोण बदलावा लागेल. त्यासाठी समाजास आ[illegible] योग्य भूमीका पार [illegible] लागेल.

सांराश

मानवाधिकार [illegible]ा अधिकार दोन्ही ही महिलांना प्रबळ बनविण्याकरिता कार्य करतात. त्यामाध्यमातून महिलांना मानवाप्रमाणे जिवन जगता येईल व त्यांच्यावरील अन्यायग्रस्त परिस्थिती दूर होईल या आशावादी इष्टीकोनातून मोठया प्रमाणावर कार्य केल्या जात आहे. भारतीय संविधान सर्वांना समान मानते. व मानवाधिकारानूसार कार्य करण्यास वाव देते तशी हमी सुध्दा देते. परंतू त्याचा फारसा प्रभाव महिलांच्या जिवनात पडलेला दिसत नाही. महिलांना पुरूषांप्रमाणे समोर आणण्याकरीता सामुहिक जबाबदारी समजून कार्य करणे आवश्यक आहे. कारण पुरूषांप्रमाणे स्त्रियांच्या वाईट परिस्थितीला महिला सुध्दा जबाबदार आहेत. त्याकरीता महिलांना अधिकाराबाबत शिक्षित व जागृत करावे लागेल. याकरीता कायदा, न्यायव्यवस्था व सरकारी यंत्रणा या माध्यमातून व्यापक स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. महिला जागृतीकरीता चर्चासत्र, परिषदा, व्याख्यानमाला, दुरचित्रवाणी, वृत्तपत्रे, साहित्य या माध्यमातून

सकारात्मक प्रयत्न दिसून येतात. तरीपण महिला हया प्राचिन काळापासून दुर्बल आहे. म्हणून त्यांना सबल करण्याकरिता वेळ लागेल. कारण हजांरो वर्षाचे प्रश्न कमी काळात नष्ट होणार नाही. म्हणून महिलांना आपल्या अधिकारांचे शिक्षण, कायदयाची प्रबळ अंमलबजावणी, महिलांचे आर्थिक स्वावलंबन अशा सकारत्मक प्रयत्नामधून महिला पबळ होण्याची स्थिती निर्माण होवू शकते. आणि मानवाधिकाराची उद्दिष्टये सफल होईल.

सदंर्भ


१. शर्मा एम.के., नारी शोषण, अर्जून पब्लिशिंग हाउस, अन्सारी रोड दरियागंज, नवी दिल्ली.

२. डॉ. शर्मा कृष्ण कुमार, महिला कानून एंव मानवाधिकार- अन्सारी रोड दरियागंज, नवी दिल्ली. 2012

3. 'इडियन पिनल कोड' 1860

४. भावना वर्मा, नरेंद्र शुक्ल, मानवाधिकार के विविध आयाम, पोईन्टर पब्लिसर्श, जयपुर, 2012

५. डॉ. निशांत सिंह, मानवाधिकार और महिलाएं, राधा पब्लिकेशन्स, नईदिल्ली.

६. योजना मासिक, महिला सबलीकरण, सप्टेंबर 2016